स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**महाराष्ट्र शासन**
**तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे**
**४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,**
**बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे - ४११ ०१६**

**दूरध्वनी क्रमांक (०२०) २५६५६२३४, Web : www.ropune.org.in Email : ropune@dtemaharashtra.gov.in**

जा.क्रः तंशिविकापु/आस्था-३(अ)/मोटारसायकल/२०२३/ 5247 दिनांक : 8 NOV 2023

प्रति,
प्राचार्य,
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,कराड.
शासकीय तंत्रनिकेतन,कोल्हापूर/कराड/मिरज.

**विषय :-मोटार सायकल अग्रिमाबाबत..**
संदर्भ :- संचालनालयाचे कार्यालयीन आदेश क्रमांक १६/आस्था/मोटर सायकल अग्रिम/२०२३-२४/२५८, दिनांक ०२/११/२०२३.

उपरोक्त संदर्भीय आदेशानुसार आपल्या संस्थेतील कर्मचाऱ्यांना २०२३-२४ मधील मोटार सायकल अग्रिम रक्कम मंजूर झालेले आहे. सदर कार्यालयीन आदेशानुसार अटी व शर्ती चे पालन करून संबधितांवर कार्यवाही करण्यात यावी. तसेच संबधित कर्मचाऱ्यांना मोटार सायकल मंजूर झालेल्या कार्यालयीन आदेशाची छायांकित प्रत देवून सेवापुस्तकात अग्रिम मंजूर झाल्याबाबतची नोंद घेण्यात यावी.

**सोबत : संचालनालयाचे पत्र.**

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत : प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेसाठी.

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४३६/४७६,
ई-मेल-desk१६@dtemaharashtra.gov.in,वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

कार्यालयीन आदेश  क्रमांक : १६/आस्था/मोटर सायकल अग्रिम/२०२३-२४/२५८

स्पीड पोस्ट  दिनांक : ०२/११/२०२३

**पहा : १) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.अग्रिम-२०१३/प्र.क्र.१०/२०१३/विनियम, दिनांक २०/०८/२०१४**
**२) शासन ज्ञापन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग,क्र. घबांअ-२०२३/प्र.क्र.४२/साशि-१, दिनांक १०/१०/२०२३**

उपरोक्त शासन निर्णयान्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे सोबत जोडलेल्या परिशिष्ठात नमूद केलेल्या या संचालनालयाच्या अधिनस्त संस्था / कार्यालयामधील अधिकारी / कर्मचाऱ्यांना सोबतच्या विवरणपत्रात नमूद इतकी अग्रिम रक्कम त्यांना नवीन मोटारसायकल /स्कूटर खरेदी करण्यासाठी शासनाच्या वरील संदर्भांकित ज्ञापनानुसार उपलब्ध झालेल्या अनुदानातून मंजूर करीत आहेत. त्यांना खालील अटी व शर्ती बंधनकारक असतील.

१. मंजूर करण्यांत आलेली आगाऊ रक्कम सदर कर्मचारी जर अस्थायी असतील तर त्यांना स्थायी कर्मचाऱ्यांचा जामीन दिल्यानंतर त्यांना अदा करण्यांत यावी.
२. वर मंजूर करण्यांत आलेली रक्कम सदर कर्मचाऱ्यांना त्यांनी वित्तीय प्रकाशन १९५९ मधील नमुना क्रमांक २० मध्ये करारनामा सादर केल्यानंतर त्यांना अदा करण्यांत यावी.
३. मुंबई वित्तीय नियम १९५९ मधील १३५ (एक)(दोन) आणि (तीन) मधील तरतूद नमूद करण्यांत आलेली आहे.
४. मंजूर करण्यांत आलेली रक्कम नवीन मोटारसायकल / स्कूटर खरेदी किंमतीपेक्षा जास्त असू नये या अटीवर मंजूर करण्यांत आलेली आहे.
५. मोटारसायकल वाहन चालविण्यासाठी सक्षम अधिकाऱ्यांकडून अनुज्ञप्ती (LICENCE) तसेच वाहनांच्या मॉडेलचे नांव, उत्पादनाचे वर्ष, खरेदीची तारीख व त्यासंदर्भाचे नोंदणीचे कागदपत्र तसेच खरेदी केल्याबाबतची (स्टॅम्प रिसिप्ट) इत्यादीबाबतच्या सांक्षांकित छायाप्रती या कार्यालयास तीन महिन्याच्या आत सादर कराव्यात.
६. सदर कर्मचाऱ्यांना मंजूर करण्यांत आलेल्या मोटारसायकल /स्कूटर अग्रिमाची वसूली संदर्भित क्र.१ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार करण्यांत यावी. ज्या मासिक हप्त्यात अग्रिम मंजूर झाले असेल त्या लगतच्या महिन्यापासून वसुली करण्यांत यावी. प्रथम अग्रिम व नंतर व्याज वसूल करण्यांत यावे. अग्रिम रकमेवरील व्याज शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक: अग्रिम-१०९५/ प्र.क्र.५६/९५/विनियम, दिनांक १.८.१९९५ अन्वये वेळोवेळी घोषित करण्यांत आलेल्या दराने मूळ अग्रिमाची परतफेड झाल्यानंतर लगतच्या महिन्यापासून वसूल करण्यांत यावे. **मात्र एखादा अधिकारी / कर्मचारी नियत**

**वयोमानानुसार उपरोक्त शासन निर्णयामध्ये नमूद मासिक हप्ते पूर्ण होण्यापूर्वीच सेवानिवृत्त होणार असेल तर त्याच्या सेवानिवृत्तीपुर्वी संपूर्ण अग्रिमाची व्याजासह वसूली होईल अशाप्रकारे वसूलीचे हप्ते निश्चित करण्यांत यावेत.** सदर कर्मचारी निवृत्त होईपर्यंतच्या कालावधीत जर वरील रक्कम व त्यावरील व्याज हे जर नमूद केलेल्या हप्त्यांमध्ये वसूल झाले नाही तर बाकी रक्कम व त्यावरील व्याज त्यांना देय असलेल्या मृत्यु-नि-सेवा निवृत्ती उपदान किंवा त्यांना अथवा त्यांच्या वारसदारांना शासनाकडून देय असलेल्या अन्य रकमेतून वसूल करण्यांत यावे.

७. अग्रिमाची उचल करावयाची नसल्यास, मुंबई वित्तीय नियम १३३ (चार) ला अनुसरुन तत्संबंधीची माहिती तात्काळ या कार्यालयास सादर करावी.

८. अग्रिम धन मंजूर करण्याबाबतचे नियम करणाऱ्या मुंबई वित्तीय नियम १९५९ प्रकरण-२ मधील तरतूदीचे काटेकोरपरणे पालन करावे.

९. वरील आगाऊ रकमेतून खरेदी केलेली मोटारसायकल / स्कूटर अग्रिमाच्या सर्व रकमेची व्याजासह परतफेड होईपर्यंत शासनाच्या मालकीची राहील.

१०. सदर कर्मचाऱ्यांना मंजूर करण्यांत आलेल्या रकमेतून घेतलेली नवीन मोटारसायकल /स्कूटर चा स्वखर्चाने 'महाराष्ट्र **इन्श्युरन्स फंड** यांच्याकडे विमा उतरावा लागेल.

११. शिक्षण व समाजकल्याण विभाग परिपत्रक क्रमांक : एबीएस/१०६१/एफ, दिनांक १५.११.१९६९ अन्वये निर्गमित करण्यांत आलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

१२. मंजूर केलेल्या अग्रिमाच्या पत्राचा क्रमांक, दिनांक व प्रमाणक क्रमांक याबाबतचा तपशिल या संचालनालयास तीन महिन्याच्या आत सादर करावा.

१३. सर्व संस्था / कार्यालय प्रमुखांना कळविण्यांत येते की, ज्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना अग्रिम मंजूर करण्यांत आलेले आहे त्यांच्या सेवा पुस्तकात सदर अग्रिमाच्या नोंदी घेण्यांत याव्यात.

**या कारणासाठी होणारा खर्च 'उच्च व तंत्रशिक्षण विभाग--मागणी क्रमांक डब्ल्यू--९-७६१०, शासकीय कर्मचारी इत्यादींना कर्जे-(००)२०२, (००)(०१) मोटार वाहन खरेदी अग्रिमे (७६१० १५३९) ५५ आगाऊ रक्कम' या शिर्षाखाली चालू वर्षी म्हणजेच सन २०२३-२४ साठी अर्थसंकल्प वितरण प्रणालीमध्ये उपलब्ध असलेल्या अनुदानाप्रमाणे खर्ची टाकण्यांत यावा. सदर देयके लवकरात लवकर पारीत करुन घेण्यांत यावीत.**

(डॉ. विनोद म. मोहितकर)
**संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

प्रत माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित:-

१. कोषागार / उपकोषागार अधिकारी, कोषागार कार्यालय, कराड / कोल्हापूर / मिरज / **चंद्रपूर** / **अमरावती** / **मूर्तिजापूर** / जिंतूर / नांदेड / नागपूर / छत्रपती संभाजीनगर (मानार्थ) (संबंधित संस्था प्रमुखांमार्फत)

२. सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे / छत्रपती संभाजीनगर / अमरावती / नागपूर, यांना असे कळविण्यांत येते की, आपल्या विभागांतर्गत वाटप करण्यांत आलेले अनुदान खर्ची पडल्याबाबतची (देयकाचा कोषागार प्रमाणक क्रमांक व दिनांक) विभागाची एकत्रित माहिती या संचालनालयास तात्काळ पाठविण्यांत यावी.

३. प्राचार्य, शासकीस अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड / चंद्रपूर / नागपूर

४. प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, कराड / कोल्हापूर / मिरज / अमरावती / मूर्तिजापूर / जिंतूर / नांदेड / छत्रपती संभाजीनगर अ.क्र. २ ते ४ यांना कळविण्यात येते की, अनुदान खर्ची पडल्यानंतर लगेचच त्याबाबतचा तपशिल (देयकाचा कोषागार प्रमाणक क्रमांक व दिनांक) संबंधित विभागीय कार्यालयास तात्काळ पाठविण्यांत यावा. तसेच संबंधित व्यक्तींच्या सेवापुस्तकात अग्रिम मंजुर झाल्याबाबतची नोंद घेण्यांत यावी व संबंधित कर्मचाऱ्यांना कार्यालयीन आदेशाची छायांकित प्रत देण्यात यावी.

५. महालेखापाल, (लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर. (मानार्थ)

६. संचालक, विमा संचालनालय, म्हाडा बिल्डिंग (गृहनिर्माण), पहिला मजला, खोली क्रमांक २६४, वांद्रे (पूर्व)मुंबई ४०० ०५१.

७. कार्यासन क्र. १५, १६ मुख्य कार्यालय, मुंबई.

(कार्यालयीन आदेश क्र.१६/आस्था/मो.सायकल/२०२३-२४/२५८,दिनांक: ०२/११/२०२३ सोबतचे परिशिष्ठ)

-: मोटार-सायकल अग्रिम २०२३-२४ :-

| अ.क्र. | अधिकारी / कर्मचारी यांचे नाव | पदनाम | संस्था / कार्यालयाचे नांव | मंजूर अग्रिम रूपये |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. सार्थक संजय भारती | कनिष्ठ लिपिक | शासकीय तंत्रनिकेतन, कराड | ७०,०००/- |
| २. | श्री. प्रकाश मशाप्पा चव्हाण | तंत्रहमाल | शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर | ७०,०००/- |
| ३. | श्री. अमोल ईश्वर मंगल | प्रमुख लिपिक | शासकीय तंत्रनिकेतन, मिरज | ७०,०००/- |
| ४. | श्री. सुखदेव मारूती दबडे | संधाता निदेशक | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड | ७०,०००/- |
| ५. | कुमारी प्रियाली भुषण खोब्रागडे | कनिष्ठ लिपिक | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,चंद्रपूर | ७०,०००/- |
| ६. | श्री. प्रसाद पुरूषोत्तम पाटील | प्रयोगशाळा सहाय्यक अतांत्रिक | शासकीय तंत्रनिकेतन, अमरावती | ७०,०००/- |
| ७. | श्री. प्रविण अभयकुमार गडकर | निदेशक तांत्रिक प्रयोगशाळा सहाय्यक | शासकीय तंत्रनिकेतन, मूर्तिजापूर | ७०,०००/- |
| ८. | श्रीमती शितल श्रीराम कागणे | निदेशक, तांत्रिक प्रयोगशाळा सहा. | शासकीय तंत्र निकेतन, जिंतूर | ७०,०००/- |
| ९. | श्री. संदीप नारायणराव पवार | वरीष्ठ लिपिक, | शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड | ७०,०००/- |
| १०. | श्री. भूषण मारोती जांभोळे | वरीष्ठ लिपिक, | शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड | ७०,०००/- |
| ११. | श्रीमती ज्योती सुरेश गलांडे | कनिष्ठ लिपिक | शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड | ७०,०००/- |
| १२. | श्रीमती किर्ती नरेंद्र बुधे | निदेशक तात्रिक प्रयोगशाळा सहा. | शासकीस अभियांत्रिकी महाविद्यालय, नागपूर | ७०,०००/- |
| १३. | श्री. सुनिल वसंतराव देशमुख | वरिष्ठ लिपिक | शासकीस तंत्रनिकेतन, छत्रपती संभाजीनगर | ७०,०००/- |
| १४. | श्री. हरेश हयात खान | कनिष्ठ लिपिक | शासकीस तंत्रनिकेतन, छत्रपती संभाजीनगर | ७०,०००/- |
| | (अक्षरी एकूण रक्कम रुपये नऊ लाख ऐंशी हजार फक्त ) | | | ९,८०,०००/- |

( डॉ. विनोद म. मोहितकर )
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

## मोटर सायकल अग्रिम वाटप करण्यांत आलेले एकूण अनुदान (सन २०२३-२४)

उपरोक्त परिशिष्ठास अनुसरुन संबंधित संस्था प्रमुखास पुढीलप्रमाणे अनुदान सुपूर्द करण्यांत येत आहे. त्यांना कळविण्यांत येते की, उपरोक्त परिशिष्ठात नमूद केल्याप्रमाणे अग्रिमाची रक्कम संबंधित कर्मचाऱ्यांना आपल्या स्तरावर प्रदान करण्यांत यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तात्काळ या संचालनालयास सादर करण्यांत यावा.

| अ. क्र. | संस्थेचे नांव / कार्यालयाचे नांव | अनुदान रक्कम (रूपये ) |
|---|---|---|
| १. | प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, कराड | ७०,०००/- |
| २. | प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर | ७०,०००/- |
| ३. | प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, मिरज | ७०,०००/- |
| ४. | प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड | ७०,०००/- |
| ५. | प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,चंद्रपूर | ७०,०००/- |
| ६. | प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, अमरावती | ७०,०००/- |
| ७. | प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, मूर्तिजापूर | ७०,०००/- |
| ८. | प्राचार्य, शासकीय तंत्र निकेतन, जिंतूर | ७०,०००/- |
| ९. | प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड | २,१०,०००/- |
| १०. | प्राचार्य, शासकीस अभियांत्रिकी महाविद्यालय, नागपूर | ७०,०००/- |
| ११. | प्राचार्य, शासकीस तंत्रनिकेतन, छत्रपती संभाजीनगर | १,४०,०००/- |
| | **(अक्षरी एकूण रक्कम रुपये नऊ लाख ऐंशी हजार फक्त )** | **९,८०,०००/-** |

( डॉ. विनोद म. मोहितकर )
**संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.**